RNI NO. MAHMAR/2020/84035

Sachin Sir's English Speaking
Its 100% guaranteed course
सबसे आसान तरीकेसे
अंग्रेजी बोलना
सिखानेके लियेही
हम जाने जाते है।
9028851719

BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ

उपलब्ध आहे!
मिस्त्री, टाइल्स फिटर, पेंटर, कारपेंटर, प्लंबर इत्यादीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
संपर्क मो. 8482839451



सोमवार ८ सप्टेंबर २०२५ | वर्ष : ५ | अंक : १७० | दैनिक | किंमत : ₹५/-
Monday 8 September 2025 | Year : 5 | Issue : 170 | Daily | Rate: Rs. 5/-

## मोदींकडून देशातील शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करणारा निर्णय : केजरीवाल



**नवी दिल्ली :** आम आदमी पार्टीचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांनी नुकतीच एक पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी केंद्रातील नरेंद्र मोदी यांच्या सरकारला धारेवर धरण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले, 'केंद्र सरकारने कापसावरील आयात शुल्क कमी करण्याचा निर्णय घेतल्यामुळे भारतातील शेतकऱ्यांना मोठा फटका बसणार आहे. मोदींच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांसमोर आत्महत्या करण्यावाचून दुसरा पर्याय उरणार नाहीत.'

केजरीवाल म्हणाले, 'आतापर्यंत आपल्या देशातील शेतकऱ्यांनी उत्पादन केलेल्या कापसाची बऱ्यापैकी विक्री होत होत होती. परंतु, अमेरिकेचा कापूस देशात फारसा विकला जात नव्हता. परंतु, मोदी सरकारने 19 ऑगस्टपासून कापसावरील 11 टक्के आयात शुल्क हटवले आहे. यामुळे अमेरिकेतून आयात केलेला कापूस भारतीय बाजारात भारतातील शेतकऱ्यांनी पिकवलेल्या कापसापेक्षा प्रति किलो 15 ते 20 रुपये स्वस्तात विकला जाईल. आपल्या देशातील शेतकरी येत्या ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात त्यांचा कापूस घेऊन बाजारात जातील तेव्हा त्यांच्या कापसाला ग्राहक मिळणार नाही. ग्राहक मिळाले तरी ते कमी भावात कापूस मागतील ज्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान होईल.' आप नेते अरविंद केजरीवाल म्हणाले, 'बहुसंख्य टेक्सटाइल कंपन्यांनी आधीच अमेरिकेवरून स्वस्त कापूस मागवला आहे. कारण सरकारने कापसावरील 11 टक्के शुल्क हटवले आहे. येत्या 31 डिसेंबरपर्यंत आयात कापसावर कुठल्याही प्रकारचे शुल्क आकारले जाणार नाही.'

> 'सरकारने शुल्क हटवल्यामुळे अमेरिकेतून आयात केला जाणारा कापूस आपल्या देशातील शेतकऱ्यांनी पिकवलेल्या कापसापेक्षा स्वस्त होईल. बहुसंख्य टेक्सटाइल कंपन्यांनी आधीच अमेरिकन कापसाची ऑर्डर दिली आहे. यामुळे भारतातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांसमोर आत्महत्येशिवाय दुसरा कुठलाही पर्याय उरणार नाही. लोक आता प्रश्न विचारत आहेत की प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशातील शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करणारा हा निर्णय का घेतला? यामागचे सत्य काहीही असो, परंतु यात केवळ भारतातला शेतकरी भरडला जाणार आहे.'
>
> – अरविंद केजरीवाल

## काशी विश्वनाथ मंदिराच्या पुजाऱ्यांना मिळणार 200 टक्के पगारवाढ



**वाराणशी :** एक ऐतिहासिक निर्णय घेत, उत्तर प्रदेश सरकारने श्री काशी विश्वनाथ मंदिर ट्रस्टच्या पुजारी आणि कर्मचाऱ्यांसाठी नवीन सेवा नियमांना मंजुरी दिली आहे. या निर्णयानुसार, त्यांना राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचा दर्जा मिळेल आणि त्यांच्या पगारातही लक्षणीय वाढ होईल. पुजाऱ्यांचे मासिक वेतन, जे आतापर्यंत सुमारे 30 हजार रुपये, ते आता नवीन नियमांनुसार जवळजवळ तिप्पट होईल. गेल्या चार दशकांतील पुजाऱ्यांच्या सेवा नियमांत ही पहिली मोठी सुधारणा आहे. नुकत्याच पार पडलेल्या 108 व्या बैठकीत, श्री काशी विश्वनाथ मंदिर ट्रस्टने इतर अनेक प्रस्तावांना मान्यता दिली. यामध्ये पारंपारिक शिक्षणाला चालना देण्यासाठी मिर्झापूरमधील काक्राही येथे मंदिराच्या 46 एकर जमिनीवर वैदिक शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था स्थापन करणे याचा समावेश आहे. याशिवाय, भाविकांचा प्रवास सुलभ करण्यासाठी काशी विश्वनाथ धाम आणि शक्तीपीठ विशालाक्षी माता मंदिर दरम्यान थेट मार्ग तयार करण्यासाठी इमारती खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली. धाममध्ये सुरक्षा उपाययोजना मजबूत करण्यासाठी एक प्रगत नियंत्रण कक्ष आणि आधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. पण, भारतातील बहुतेक राज्यांमध्ये हिंदू पुजाऱ्यांना सरकारी कर्मचारी मानले जात नाही, तेलंगणा हा अपवाद आहे.

## सर्वोच्च न्यायालयाने केंद्र आणि राज्य सरकारांना बजावली नोटीस



निसर्गाचा प्रकोप, सर्वोच्च न्यायालयाने घेतली गंभीर दखल

**नवी दिल्ली :** प्रसिद्ध दाक्षिणात्य अभिनेता अल्लू अर्जुन याचा पुष्पा चित्रपट बेकायदेशीर चंदन तस्करीवर बेतलेला होता. सिनेमाच्या पहिल्या भागात चंदनाचे लाकूड नदी मार्गाने तस्करी केल्याचा एक सीन दाखविण्यात आला होते. अशाच प्रकारचा सीन काही दिवसांपूर्वी हिमाचल प्रदेशमध्ये दिसला. चिनाब नदीवर बांधलेल्या किश्तवाडमधील डूल धरणात मोठ्या प्रमाणात लाकडाचे ओंडके आणि कापलेल्या झाडांचे ढिगारे आढळून आले. शीतला नामक पुलावरून घेतलेला सदर व्हिडीओ मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला. यामुळे हिमालयाच्या खोऱ्यात मोठ्या प्रमाणात जंगलतोड होत असल्याचे दिसून आले. या व्हायरल व्हिडीओनंतर सर्वोच्च न्यायालयाने 4 सप्टेंबर रोजी या प्रकरणाची स्वतःहून दखल घेतली. वाढणारे पूर, भूस्खलन या धोक्यांबरोबरच बेकायदेशीर जंगलतोडीवर चिंता व्यक्त केली. मुख्य न्यायाधीश भूषण गवई आणि न्यायमूर्ती विनोद चंद्रन यांनी नोंदविलेल्या निरीक्षणानुसार, पुरात मोठ्या प्रमाणात लाकडाचे ओंडके वाहून जात आहेत. यामुळे डोंगराळ भागात बेकायदेशीर वृक्षतोड होत असल्याचे समोर आले.

यानंतर सर्वोच्च न्यायालयाने एनडीएमए, पर्यावरण मंत्रालय, जलशक्ती मंत्रालय, एनएचएआय आणि हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, पंजाब आणि जम्मू-काश्मीर राज्य सरकारना नोटीस बजावल्या आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून या प्रकरणाची दखल घेतल्यानंतर पर्यावरणवादी कार्यकर्ते आणि तज्ज्ञांनी याचे स्वागत केले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या पुढाकारामुळे हिमाचल प्रदेशच्या पर्यावरणाचे रक्षण करण्यास यंत्रणांना भाग पाडले जाऊ शकते. संवेदनशील अशा पर्वत रांगेत बेधडक राबविण्यात येणाऱ्या विकास प्रकल्पांना रोखण्यासाठी शाश्वत धोरणे आवश्यक आहेत, अशी अपेक्षा पर्यावरणवाद्यांनी व्यक्त केली आहे.

### मंत्र्यांनी वन अधिकाऱ्यांना धरले दोषी

हिमाचल प्रदेशचे उद्योग मंत्री हर्षवर्धन चौहान यांनी भारतीय वन सेवेतील अधिकाऱ्यांना बेकायदेशीर वृक्षतोडीसाठी जबाबदार धरले. वृक्षतोड रोखण्यात आयएफएस अधिकारी अपयशी ठरत असल्याचे आणि वनक्षेत्राचे सर्वेक्षण करण्यात दुर्लक्ष होत असल्याचा आरोप त्यांनी केला. आयएफएस अधिकारी आणि विभागीय वन अधिकारी जंगलात क्वचितच तपासणी करतात आणि भेटीही देत नाहीत. ही जबाबदारी आता गार्ड्सवर टाकली जाते. अधिकाऱ्यांनी जंगलतोडीचे प्रमाण आणि त्याचा परिणाम यावर लक्ष ठेवायला हवे. ही एक गंभीर समस्या आहे. याकडे तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे. नद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात लाकूड आणि कापलेले ओंडके वाहून जात असल्याचा व्हायरल व्हिडीओ आश्चर्यकारक असल्याचेही ते म्हणाले.

## उपराष्ट्रपती निवडणुकीपूर्वी विरोधी पक्षाचा आज मॉक व्होटिंग ...




**नवी दिल्ली :** उपराष्ट्रपतीपदाची निवडणूक 9 सप्टेंबर रोजी होणार आहे. राजकीय पक्षांमध्ये याची चर्चा वाढत आहे. दरम्यान, इंडिया ब्लॉकमधील सूत्रांनी रविवारी माहिती दिली की उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीपूर्वी विरोधी खासदारांना सोमवारी मतदान प्रक्रियेची माहिती दिली जाईल. त्यानंतर, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आज संध्याकाळी संसदेच्या परिशिष्टात त्यांच्यासाठी जेवणाचे आयोजन करतील. इतकेच नाही तर, सूत्रांनी असेही सांगितले की सोमवारी दुपारी 2:30 वाजता संसद भवनाच्या सेंट्रल हॉलमध्ये 'मॉक पोल' म्हणजेच बनावट मतदान देखील केले जाईल जेणेकरून खासदारांना मतदान प्रक्रिया समजेल. एनडीएने भाजपचे अनुभवी नेते आणि महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांना उमेदवारी दिली आहे. दुसरीकडे, सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश बी. सुदर्शन रेड्डी विरोधी पक्षाकडून निवडणूक लढवत आहेत. हे लक्षात घेण्यासारखे आहे की दोन्ही उमेदवार दक्षिण भारतातील आहेत, राधाकृष्णन हे तामिळनाडूचे आहेत. रेड्डी हे तेलंगणाचे आहेत. उपराष्ट्रपती निवडणुकीचे निवडणूक अधिकारी आणि राज्यसभा सचिव पीसी मोदी यांनी सांगितले की, मतदान 9 सप्टेंबर रोजी सकाळी 10 वाजता सुरू होईल आणि संध्याकाळी 5 वाजता बंद होईल.

## ... हा तर मणिपूरच्या लोकांचा अपमान ! काँग्रेस



**इम्फाळ :** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या 13 सप्टेंबर रोजी मणिपूरचा दौरा करणार आहेत. राज्यातील हिंसाचार सुरू झाल्यानंतर प्रधानमंत्री मोदींचा हा पहिलाच दौरा आहे. यावर सर्व राजकीय पक्षांकडून प्रतिक्रिया येत आहेत. काँग्रेसने या दौऱ्यावरुन सरकारवर बोचरी टीका केली. काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी प्रधानमंत्री मोदींच्या दौऱ्यावर टीका करतांना म्हटले की, 13 सप्टेंबर रोजी प्रधानमंत्र्यांच्या प्रस्तावित मणिपूर दौऱ्याचे त्यांच्या समर्थकांकडून स्वागत केले जात आहे, परंतु ते राज्यात फक्त 3 तास घालवणार आहेत. इतक्या घाईघाईत केलेल्या या दौऱ्यातून काय साध्य होणार आहे? हा राज्यातील लोकांचा अपमान आहे. त्यांनी 29 वेदनादायक महिने प्रधानमंत्र्यांची वाट पाहिली आहे. यामुळे मणिपूरच्या लोकांबद्दल त्यांची उदासीनता आणि असंवेदनशीलता दिसून येईल,' अशी बोचरी टीका जयराम रमेश यांनी केली. काँग्रेस व्यतिरिक्त शिवसेना (उबाठा) नेते खासदार संजय राऊत यांनीदेखील पीएम मोदींच्या दौऱ्यावर टीका केली. ते म्हणाले, 'जर ते मणिपूरला जात असतील, तर त्यात मोठी गोष्ट काय? ते प्रधानमंत्री आहेत, ते दोन-तीन वर्षांनी तिथे जात आहेत. जेव्हा मणिपूर जळत होते, हिंसाचार भडकला होता, तेव्हा त्यांना जाण्याची हिंमत झाली नाही. आता मोदींनी प्रधानमंत्रीपद सोडण्याची वेळ आली आहे, म्हणून ते पर्यटनासाठी तिथे जात आहेत.


## बानाई क्रेडिट को ऑपरेटिव्ह सोसायटी लि. नागपूर जिल्हा

### दुसऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

(फक्त संस्थेच्या साभासदांकरिता)

बानाई क्रेडिट को ऑपरेटिव्ह सोसायटी लि. नागपूर जिल्हा संस्थेच्या सर्व भागधारक सभासदांना कळविण्यात येत आहे कि, आपल्या संस्थेची दुसरी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दि. 19/09/2025 ला सकाळी 10.00 वाजता संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. अनुपकुमार जगन्नाथ सांगोळे यांच्या अध्यक्षेखाली खालील नमूद केलेल्या विषयावर विचार विनिमय व ठराव संमत करण्याकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक सभागृह, उरुवेला कॉलनी वर्धा रोड, नागपूर, 440015, येथे आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस उपस्थित राहावे ही नम्र विनंती. गणपूर्तीच्या अभावी सभा तहकूब झाल्यास हि सभा त्याचदिवशी, त्याच ठिकाणी त्याच विषयावर, अर्ध्या तासानंतर सुरु होईल. त्यास गणपुर्तीची आवश्यकता राहणार नाही. सभेत पुढील विषयावर विचार विनिमय करून निर्णय घेण्यात येतील.

**सभेपुढील विषय :-**

1. मागील वार्षिक सर्वसाधारण सभा दि. 28/04/2025 रोजीचा इतिवृत्तांत वाचून मंजूर करणे.
2. सन 2024-2025 चे नफा तोटा पत्रक व ताळेबंद पत्रकास मंजुरी प्रदान करणे.
3. सन 2025-2026 या वर्षाचे अंदाज पत्रकास मंजुरी देणे.
4. रान 2024-2025 वर्षाच्या नफा विभागणीस मंजुरी देणे.
5. मा. संचालक मंडळाच्या शिफारशी नुसार सन 2024-2025 च्या लाभांश वाटपास मंजुरी देणे,
6. सन 2024-2025 चे संवैधानिक लेखापरीक्षण व दोष दुरुस्ती अहवालास मंजुरी देणे.
7. सन 2025-2026 वर्षाकरिता संवैधानिक लेखापरीक्षकांची नियुक्ती व मानधनास मंजुरी देणे,
8. आर्थिक वर्ष 2024-2025 मध्ये केलेल्या गुंतवणुकीला कार्योत्तर मंजुरी देणे.
9. कर्ज मंजुरीची मर्यादा वाढवणे.
10. महाराष्ट्र शासनाच्या सहकार विभागाद्वारे नव्याने निर्मित आदेशान्वये, को ऑप सोसायटी करिता सुधारित आदर्श उपविधीस मंजुरी देणे.
11. मा. अध्यक्षाच्या परवानगीने वेळेवर येणारे इतर विषयावर विचार विनिमय करणे.

नागपूर
दिनांक : 20/08/2025

स्वा. अध्यक्ष
बानाई क्रेडिट को ऑपरेटिव्ह सोसायटी लि. नागपूर जिल्हा

**विशेष सूचना**

1. ज्या सभासदना वरील विषयाच्या अनुषंगाने काही प्रश्न अथवा सूचना करावयाच्या असल्यास त्यांनी सभेच्या 7 दिवस अगोदर संस्थेच्या कार्यालयात लेखी स्वरूपात अर्ज द्यावा त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.
2. सभासदांनी आपल्या पत्यात बदल झाला असल्यास संस्थेला आपला नवीन पत्ता त्वरित कळवावा.
3. ज्या सभासदांनी भागाचे दाखले (शेयर सर्टिफिकेट) नेले नसतील त्यांनी कार्यालयातून घेऊन जावे.
4. ज्या सभासदांना त्यांच्या पत्त्याच्या अभावी अहवाल प्राप्त झाला नसेत त्यांनी हेच निमंत्रण समजून येण्याचे करावे हि विनंती.


## 'सोशल इन्फ्लुएंसर अवॉर्ड' द्वारे डिजिटल क्रिएटर्सचा गौरव








**नागपूर :** समाजमाध्यमांद्वारे समाजातील उपेक्षित घटकांना आवाज देणारे, सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणारे, जनजागृती करणारे तसेच शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, महिला सक्षमीकरण, कला-संस्कृती आणि समाजहितासाठी कार्यरत असणाऱ्या जवळपास 30 पेक्षा अधिक प्रभावी डिजिटल निर्मात्यांचा 'सोशल एन्फ्लुएंसर अवॉर्ड' या विशेष सोहळ्याच्या माध्यमातून गौरव करण्यात आला. टेक्नोटिअम टेक आणि मधुकरराव तामगाडगे ट्रस्ट यांच्या सहकार्याने प्रवर्तन इव्हेन्ट्सच्या माध्यमातून हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.

हा सोहळा डॉ. बाबासाहेब आंबेडकर, इंटरनॅशनल कन्व्हेंशन सेंटर, कामठी रोड, नागपूर येथे संपन्न झाला. कार्यक्रमाचे उद्घाटन, प्रमुख पाहुणे रणजीत मेश्राम यांनी केले. सोशल मीडिया हे केवळ करमणुकीचे साधन नसून परिवर्तनाचे प्रभावी माध्यम ठरू शकते, हा संदेश या सोहळ्याद्वारे देण्यात आला. यामध्ये वैद्यकीय क्षेत्रात अतुलनीय कामगीरीसाठी पद्मश्री डॉ. चंद्रशेखर मेश्राम, बाल साहित्यासाठी प्रशांत तांबे, पत्रकारीतेसाठी सुमित चव्हाण, गौतम बोंबार्डे तर, नोकरी निर्मात्यांमध्ये रोहन मेश्राम, चित्रपट निर्देशकासठी शैलेश नरवाडे, वैशाली पिल्लेवान तसेच विपूल कल्याण आणि स्टोरी टेलरमध्ये स्वाती पाटील व संघर्ष म्हैसकर, व्यवसायीक या श्रेणीत संजय गोसावी, गीरिष डोहाणे आणि धम्मदीप खोब्रागडे, सर्वोत्तम प्रशिक्षकांमध्ये अनुप कुमार, व्हायरल रेडिओ जॉकिसाठी आर.जे. अमोध, तंत्रज्ञान या श्रेणीत साकेत डोंगरे, रॅपच्या माध्यमातून जनचेतनेचे काम करणारे नाम सूजल, विपिन तातड, विद्रोही, कलेच्या माध्यमातून जनजागृती करणारे सिद्धेष गौतम आणि टॅन्जो लामा, सोशल कॉमिडीसाठी मोनाली सहारे आणि वैभव सोनावणे, महिला सक्षमिकरणासाठी पुष्पाताई बौद्ध, ऐतिहासीक कंटेट क्रिएटरसाठी सागर कांबळे, तरूण राजकारणीसाठी डी. हरी कृष्णा, खेळाडू या श्रेणीत प्रतिष्ठा जांभूळकर आणि रोहन जगताप, पॉडकास्ट या श्रेणीत दीपाशा पाटील आणि राहुल डोंगरे यांचा गौरव करण्यात आला. या सोहळ्यासाठी स्मृतिशेष तामगाडगे चॅरिटेबल ट्रस्ट आणि टेक्नोटिअम टेक यांच्या सहकार्याने प्रवर्तन इव्हेंट्सच्या माध्यमातून सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यात आर.जे. शँकी आणि आकांक्षा तिरपुडे हिने संचालन केले. या सोहळ्यास मोठ्या संख्येने जनतेने सहभाग नोंदवला.

### धम्मक्रांतीसाठी विहारांची आवश्यकता : चर्चासत्रात सर्वानुमते ठराव

## बौद्ध धम्मासंदर्भात महिलांचे मोठे योगदान!




**नागपूर :** बौद्ध धम्म हा मानवकल्याणाचा मार्ग असून तो स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या चार तत्वांवर आधारलेला आहे. तथागत बुद्धांनी महाप्रजापती गौतमी यांच्या पुढाकाराने महिला संघाची स्थापना केली, यावरून धम्म स्त्री-पुरुष समानतेवर आधारित आहे हे स्पष्ट होते, असे प्रास्ताविक भाषणात वृंदा खंडारे यांनी सांगितले. दैनिक बहुजन सौरभ आणि टेक ऑफ सिटी रमाई महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'धम्मक्रांतीसाठी विहारांची आवश्यकता' या चर्चासत्रात विविध वक्त्यांनी विचार मांडले.

अध्यक्षीय भाषणात भाविका गोसावी म्हणाल्या, 'ब्राह्मणीकरणामुळे बौद्ध विचारांचा वारसा धोक्यात येत आहे. महाबोधी विहार ही याची ठळक उदाहरण आहे. विहार हे बौद्धांचे असूनही आज तिथे इतर अधर्मीयांचे वर्चस्व दिसते, ही चिंताजनक बाब आहे. सरकारने त्वरित कारवाई करून बौद्धगया मुक्ती महाआंदोलनाला न्याय द्यावा. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशात बुद्ध विचारांचा पुनर्जन्म घडवला, आपण सर्वांनी त्यांचे स्वागत आणि संवर्धन केले पाहिजे.'

शहर-गाव दुवा आवश्यक वाटते असे मत शालिनी मेश्राम यांनी शहरातील कार्यकर्त्यांनी ग्रामीण भागाशी नाते जोडण्याची आवश्यकता अधोरेखित केली. 'गावकुसाबाहेर असलेल्या लहान विहारांमध्ये अजूनही अशिक्षित लोक बाबासाहेबांवर कविता रचतात, गाथा म्हणतात. शहरातील सुशिक्षितांनी त्या ठिकाणी जाऊन धम्माचा प्रसार करणे गरजेचे आहे,' असे त्यांनी नमूद केले. विहारांचे क्रेंद्रीकरण हवे असे नीलिमा बाराहाते यांनी विहारातील फाटाफूट, गटबाजी यावर चिंता व्यक्त केली. 'विहार हे समाजाचे क्रेंद असले पाहिजे. विहारात येतांना एकजुटीने समाजातील प्रश्नांवर उपाय शोधण्याचा दृष्टीकोन ठेवला पाहिजे,' असे त्यांनी सांगितले.

सुषमा गायधनी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आदेशाचा दाखला देत सांगितले, 'दर रविवारी प्रत्येक बुद्ध विहारात जाणे, खेडी-पाड्यात व मोहल्ल्यातील विहारात उपस्थित राहणे हे प्रत्येक बौद्धाचे कर्तव्य आहे.' विहारातून शिक्षणाची दिशा मिळते असे शुद्धोधन बडवने यांनी आपल्या अनुभवातून सांगितले की, 'विहारातील अभ्यासिकेमुळे पंधरा पेक्षा अधिक मुलांना नोकऱ्या मिळाल्या आहेत. हे विहाराचे जोमदार काम समाजासाठी आदर्श ठरावे.' विचारांचा प्रसार आवश्यक आहे असे सांगत. रिमा बडगे यांनी आवाहन केले की, 'बुद्ध विहार हे धम्मक्रांतीचे मशालवाहक आहेत. फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार जर प्रत्येक घराघरात पोहोचवायचा असेल तर विहारातून संघटित कार्य करणे अत्यावश्यक आहे.' कार्यकारी संपादक विलास गजभिये म्हणाले, 'विचारांची जनजागृती करण्यासाठी वृत्तपत्र हे काळाची गरज आहे. नागपूरमधून प्रकाशित होत असलेल्या या उपक्रमांत अधिकाधिक लोकांनी योगदान द्यावे.' या चर्चासत्रात संध्या घोडके यांनी धम्मगीत सादर केले. प्रज्ञा कांबळे यांनी संचालन केले तर विजया सोमकुंवर यांनी आभार मानले. निवासी संपादक प्रा. संध्या राजूरकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. प्रा. प्रिती तिरपुडे, ज्योत्स्ना बनसोड यांनी विशेष सहकार्य केले. नरेश मेश्राम, राजकुमार वंजारी, प्रा. मुकुंद मेश्राम यांचीही उपस्थिती होती.




दैनिक
बहुजन सौरभ

बहुजनांच्या सामाजिक व सांस्कृतिक चळवळीचे मुखपत्र

नियमित अंक

आपल्या शुभेच्छा व जाहिराती खालील पत्यावर पाठवाव्यात.

परिवर्तन

जाहिरात दरपत्रक

पूर्ण पान – ५० हजार रूपये
अर्ध पान – ३० हजार रूपये
पाव पान – १५ हजार रूपये

शुभेच्छा व्यक्तीशः फक्त ३ हजार रूपयांपासून सुरू

वाचकांना आवाहन
आम्ही वाचतो, तुम्हीपण वाचा!

टीप – पेमेंट अगोदर

:: दैनिक बहुजन सौरभ कार्यालय ::
१/२, स्वराज कॉलनी, अजनी पोलिस स्टेशनजवळ, वंजारीनगर, पाण्याच्या टाकीजवळ, मेडिकल कॉलेज मागे, तुकडोजी महाराज पुतळा मार्ग, नागपूर–४४००२४
मेल– bahujansaurabh@gmail.com
संपर्क –9422860648, 9421588901



“ नम्रता आणि सद्गुणांनी जीवन अधिक सुंदर होते. ”



## संपादकीय

# डिजिटल शिक्षक क्रांती की भ्रम?

आजच्या काळात शिक्षणाची दिशा व गती दोन्ही बदलत आहेत. पूर्वी वर्गखोल्यात फळा-खडू, पुस्तके व शिक्षक हाच शिक्षणाचा केंद्रबिंदू होता. परंतु तंत्रज्ञानाच्या झपाट्याने झालेल्या प्रगतीमुळे ‘डिजिटल शिक्षक’ ही संकल्पना वेगाने पुढे येत आहे. मोबाईल, संगणक, इंटरनेट, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि विविध शैक्षणिक ॲप्स यांमुळे आज विद्यार्थी ज्ञानाच्या महासागराशी थेट जोडले जात आहेत. डिजिटल शिक्षक म्हणजे केवळ ऑनलाइन क्लासेस नाहीत, तर स्मार्ट क्लासरूम, ई-लर्निंग प्लॅटफॉर्म्स, व्हिडिओ लेक्चर्स, वर्च्युअल प्रयोगशाळा, तसेच विद्यार्थी-विशिष्ट अभ्यासपद्धती देणारी साधने यांचा एकत्रित परिणाम आहे. या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थी असो वा शहरातील, सर्वांना एकसमान दर्जाचे ज्ञान मिळू शकते. ज्ञानाचा हा लोकशाहीकरणाचा प्रवास खऱ्या अर्थाने शिक्षणक्रांती आहे. मानवी शिक्षकांचे अविस्मरणीय स्थानमात्र डिजिटल शिक्षक कितीही सक्षम झाले तरी मानवी शिक्षकांची भूमिका पर्यायविहीन आहे. कारण शिक्षक केवळ माहिती देत नाहीत, ते संस्कार घडवतात, शंकानिरसन करतात, विद्यार्थ्यांचे मानसिक आधारस्तंभ बनतात. डिजिटल साधनांमध्ये करुणा, संवेदनशीलता किंवा प्रेरणा देण्याची क्षमता नाही. विद्यार्थी घडवतांना शिक्षकाचे व्यक्तिमत्त्व, त्यांचा जीवनानुभव आणि त्यांच्या संवादातून उमटणारा भावनिक स्पर्श हा केवळ मानवी शिक्षकच देऊ शकतो. तंत्रज्ञानामुळे शैक्षणिक समानतेची संधी निर्माण झाली, पण त्याचबरोबर नवे दरी-उतारही दिसू लागले आहेत. इंटरनेट, वीज किंवा उपकरणे नसलेल्या विद्यार्थ्यांना हे साधन लाभदायी ठरत नाही. तसेच डिजिटल व्यसन, कॉपी-पेस्ट संस्कृती, मानवी संवादाचा अभाव यांसारखी दुष्परिणामकारक आव्हाने उभी राहिली आहेत. त्यामुळे डिजिटल शिक्षक आणि मानवी शिक्षक यांच्यात समतोल साधणे ही काळाची गरज आहे.शिक्षणाचे भवितव्य हे डिजिटल साधने आणि मानवी शिक्षक यांच्या समन्वयात आहे. ज्या दिवशी शिक्षक तंत्रज्ञानाचा शहाणपणाने वापर करून विद्यार्थ्यांना ज्ञानासोबत मूल्ये, विचारशक्ती आणि सामाजिक भान देऊ लागतील, त्या दिवशी खरी शिक्षणक्रांती घडेल. त्यामुळे डिजिटल शिक्षक आणि शिक्षक हे एकमेकांचे प्रतिस्पर्धी नसून परस्परपूरक आहेत. भारतीय शिक्षणपद्धती आज दोन टोकांवर उभी आहे. एका बाजूला डिजिटल शिक्षकांची झपाट्याने वाढणारी ताकद आणि दुसऱ्या बाजूला मानवी शिक्षकांचे शाश्वत अस्तित्व. हा संघर्ष प्रत्यक्षात ‘शिक्षक विरुद्ध तंत्रज्ञान’ असा नसून, ‘शिक्षणाच्या मानवीतेचे रक्षण’ की ‘ज्ञानाचा वेगवान प्रसार’ यामधला समतोल साधण्याचा आहे. डिजिटल शिक्षक ही संकल्पना आधुनिक काळातील शिक्षणक्रांती ठरते. एका क्लिकवर जागतिक दर्जाचे लेक्चर्स, वर्च्युअल प्रयोगशाळा, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित प्रश्नोत्तरे आणि वैयक्तिक शिकण्याच्या गतीनुसार बदलणारी साधने उपलब्ध होत आहेत. हे नाकारता येत नाही की डिजिटल साधनांमुळे विद्यार्थ्यांना संधींचे आकाश खुलले आहे. ग्रामीण-शहरी दरी मिटवण्याची ताकद या तंत्रज्ञानात आहे. पण प्रश्न असा आहे. फक्त तंत्रज्ञान म्हणजे शिक्षण का? माहितीचा प्रचंड ओघ म्हणजेच ज्ञानाचा प्रकाश का? शिक्षक फक्त पाठ्यपुस्तक वाचून दाखवणारे यंत्र नसतात. ते विद्यार्थ्यांच्या जीवनाचे शिल्पकार असतात. शिक्षकांच्या डोळ्यातील आपुलकी, त्यांच्या आवाजातील प्रेरणा, त्यांच्या जीवनानुभवातून उमटणारे सत्य–ही कोणतीही स्क्रीन किंवा ॲप देऊ शकत नाही. डिजिटल शिक्षक माहिती देतात, पण मानवी शिक्षक माणूस घडवतात. ही दोन गोष्टी कधीच पर्यायी ठरू शकत नाहीत. डिजिटल साधनांचा वापर नाकारता येणार नाही, पण त्यावर अंधविश्वासही ठेवता येणार नाही. इंटरनेट, वीज आणि उपकरणे नसल्याने लाखो विद्यार्थी या क्रांतीपासून वंचित राहतात, ही वस्तुस्थिती कडू आहे. तसेच डिजिटल व्यसन, वैचारिक आळस आणि मानवी संवादाचा अभाव या दुष्परिणामांकडे डोळेझाक करता येणार नाही. शिक्षणाचे खरे सामर्थ्य तेव्हाच उभे राहते, जेव्हा तंत्रज्ञान आणि शिक्षक हातात हात घालून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करतात. डिजिटल शिक्षक आणि शिक्षक हे शत्रू नाहीत; ते परस्परपूरक आहेत. पण जर समाजाने मानवी शिक्षकाला मागे सारले, तर शिक्षणाचे मानवी रूप हरवून बसू. तंत्रज्ञान हे साधन आहे, शिक्षक हा आत्मा आहे. साधन आत्म्याला पूरक झाले तरच शिक्षण खऱ्या अर्थाने प्रकाशमान होईल.’ ■ ■

# भगवान बुद्ध एक भौतिकशास्त्रज्ञ

**आधुनिक विज्ञानाच्या इतिहासात अणू, इलेक्ट्रॉन आणि प्रोटॉन यांच्या शोधाने विश्वाचे रहस्य समजून घेण्याचे नवीन दालन उघडले. 1897 मध्ये जे. जे. थॉमसन यांनी इलेक्ट्रॉनचा शोध लावला, तर 1917-1920 मध्ये अर्नेस्ट रदरफोर्ड यांनी प्रोटॉनचा शोध घेतला. 20 व्या शतकात वैज्ञानिकांनी अणूचे स्वरूप व त्यातील कणांचे गतीमान अस्तित्व सिद्ध केले.**

आश्चर्य म्हणजे 2600 वर्षांपूर्वी तथागत बुद्धांनी कोणत्याही उपकरणाशिवाय, फक्त ध्यानाच्या सामर्थ्याने आणि अंर्तज्ञानाच्या प्रकाशाने, हेच सत्य प्रत्यक्ष अनुभवले होते. त्यांनी सांगितले -

**‘सब्बो पज्जलितो लोको, सब्बो लोको पकम्पितो।’**
(संपूर्ण लोक प्रज्वलित आहे, संपूर्ण लोक प्रकंपित आहे.)

**लोक म्हणजे विश्व :** भौतिक जगाचे स्वरूप कलाप सिद्धांत बुद्धांच्या अनुभवांतून उमगले की आपल्याला दिसणारे शरीर व जग ठोस नाही. ते केवळ तरंग आहेत,हे भासमान सत्य आहे (Conventional Truth) बुद्ध म्हणतात परमसत्य असे की जगातील सर्व पदार्थ सूक्ष्मतम घटकांनी (कलापांनी) बनलेले आहेत.

**कलाप म्हणजे अणूपेक्षाही सूक्ष्म कण :**
बुद्धांनी कलाप हा शब्द वापरला. बुद्ध म्हणतात, तो कोणताही स्थिर कण नसून तरंगांचा पुंज आहे. एका कलापात आठ घटक, पृथ्वी, जल, अग्नी, वायु व त्यांच्या गुणधर्मांचा समूह असतो. त्यामुळे त्याला अष्टकलाप असे म्हणतात. हे कलाप प्रतिक्षण उत्पन्न होतात व नष्ट होतात. त्यामुळे वस्तू आपल्याला ठोस भासते पण वास्तविक तो बुड बुदबुदा असतो. बुद्धांनी याला संततिघन म्हटले. अष्टकलाप हे अनुपेक्षाही सूक्ष्म असतात आणि ते पृथ्वी, तेज, आप, वायू या चार घटकांनी व चार त्यांचे गुणधर्म यांनी बनलेले आहेत, आणि उत्पन्न होणे आणि नष्ट होणे म्हणजेच उत्पाद- व्यय हा त्यांचा धम्म (गुणधर्म) आहे. विज्ञानाने जे ‘Sub-atomic Vibrations’ म्हणून मांडले, त्याचा अनुभव बुद्धांनी प्रत्यक्ष ध्यानातून घेतला होता.

**आता आधुनिक काळात :**
आधुनिक भौतिकशास्त्र मानते की विश्वातील प्रत्येक कण सतत गतिशील आहे. अणूतील इलेक्ट्रॉन प्रोटॉन हे स्थिर नसून अखंड गतीत आहेत. फिरत आहेत. बुद्धांनी याच सत्याला अनित्यता (Impermanence) असे नाव दिले. त्यांच्या मते प्रत्येक वस्तू उदय व्ययधर्मी आहे. उत्पन्न होणे व नष्ट होणे, अनित्य आहे हीच तिची प्रकृती आहे. म्हणूनच शरीर वा जग काहीही शाश्वत नाही. यामुळे बुद्धांचे म्हणणे विज्ञानाशी असलेले साम्य आपल्याला ठळकपणे दिसते. नव्हे बुद्धाने ते 2600 वर्ष पूर्वी शोधले.

आधुनिक विज्ञान सत्य शोधण्यासाठी प्रयोगशाळेचा वापर करते. बुद्धांनी मन व शरीर हीच प्रयोगशाळा मानले. बुद्धाने सतीपठ्ठान हा उपदेश केला. आणापाने सती व चार स्मृती उपस्थान सांगितले. ही बुद्धाची ध्यान पद्धती आहे. यामध्ये ध्यान करणारा आपले श्वास, संवेदना, विचार व प्रतिक्रिया यांचे निरपेक्ष निरीक्षण करतो.

यामुळे त्याला भासमान सत्यापलीकडे जाऊन सूक्ष्म परमसत्याचा अनुभव येतो. शरीर व चित्त हे तरंगांचे समूह आहेत, हे प्रत्यक्ष अनुभूतीत उतरते. बुद्धांनी सांगितले की ‘दर्शन म्हणजे मत नव्हे, तर जाण्यता आहे.’ म्हणजेच, सत्य हे मतांत, कल्पनांत वा परंपरेत नाही, तर प्रत्यक्ष अनुभूतीत आहे.



**बुद्ध - मनोविज्ञानाचे जनकसुद्धा होते :**
बुद्धांचे योगदान फक्त भौतिक सत्यापुरते मर्यादित नाही, तर ते मानवी मानसशास्त्राचेही जनक आहेत. त्यांनी दुःखाचे मूळ तृष्णा व अज्ञान यात शोधले. त्यांनी मानवी स्वभाव बदलण्याचा मार्ग ‘आर्य अष्टांगिक मार्ग’ दिला.

त्यांनी ध्यानाद्वारे मनाचे शुद्धीकरण व विचारांचे रूपांतर करण्याची पद्धत जगाला दाखवली. आज आधुनिक मानसशास्त्र ‘Mindfulness’, ‘Behavioural Therapy’ यांची चर्चा करते. पण त्यांची मूळ प्रेरणा बुद्धांच्या ध्यानशास्त्रात अर्थात सतीपठ्ठान मध्ये आहे. भौतिक व मानसिक जगाची साधन प्रयोगशाळा मन व शरीर हेच आहे. आज विज्ञानाने जे सिद्ध केले आहे ते बुद्धांनी आधीच अनुभवले आहे. म्हणून बुद्धांचे विचार सिद्ध करण्यासाठी विज्ञानाची आवश्यकता नाही. उलट विज्ञानालाच बुद्धांच्या अनुभूतीतून दिशा मिळते. बुद्ध हे केवळ धर्मसंस्थापक नव्हते; ते जगातील पहिला महान भौतिक, वैद्यक आणि महान मनोवैज्ञानिक होते. त्यांनी जगाला शिकवले की सत्य हे प्रत्यक्ष अनुभूतीत आहे.



अनिल वैद्य
माजी न्यायाधिश
9657758555

अनेक वैज्ञानिक, तत्त्वज्ञ आणि न्यूरोसायन्स तज्ञांच्या दृष्टिकोनातून बुद्धांच्या शिकवणुकींचे वैज्ञानिक दृष्ट्या आकलन, त्यांचे गुण, आणि त्यांच्या विचारांच्या सुव्यवस्थितपणे संज्ञानात्मक आणि भौतिकशास्त्रीय अर्थांची चर्चा केली आहे. प्रसिद्धवैज्ञानिकांच्या बुद्धा विषयीच्या टिप्पणी अशा की, निल्स बोहर (Niels Bohr) यांनी, आणि जे. रॉबर्ट ओपेनहायमर यांनी,आणि अल्बर्ट आइंस्टीन यांनी बुद्धांच्या विचारांमध्ये आधुनिक भौतिकशास्त्राशी साम्य असल्याचे स्पस्ट केले आहे.

दलाई लामा यांनी विज्ञान आणि बुद्धधर्म यांची तर्कशुद्ध तुलना केली आहे. ‘मी माझा विश्वास विज्ञानाप्रमाणेच बुद्धधर्मही सत्याचा शोध अनुभवातून घेण्याचा मार्ग मांडतो... जर विज्ञानाने निर्विवादपणे बुद्धधर्मातील कोई गोष्ट खोटी ठरवली तर आम्ही ती स्वीकारून त्याला सोडून द्यायला तयार आहोत.

3. तत्त्वज्ञ आणि न्यूरोसायन्समध्ये संतुलन बी ॲलन वाल्स (B. Alan Wallace) म्हणतात की बुद्धधर्म एक सुव्यवस्थित तत्त्वज्ञ आणि अनुभव-आधारित प्रणाली आहे, विशेषतः मानसिक अवस्थांवर केंद्रित आहे (ज्ञान-मनोविज्ञान) – जे विज्ञानाला पूरक आहे.

रॉबर्ट तुरुमन (Robert Thurman) बुद्धाच्या ध्यानाला ‘आंतरिक विज्ञान’ (inner science) म्हणतात आणि चेतनेच्या अभ्यासाला भौतिकवादाच्या सीमापलीका म्हणून पाहतात.

ट्रिंग जुहान थूआन (Tring Xuhan Thuan,) खगोलशास्त्रज्ञ, बुद्धधर्म आणि विज्ञान यांना समांतर ज्ञानाचे दोन मार्ग मानतात आणि ‘उभय दृष्टिकोनांत संवाद फायद्याचा ठरू शकतो’ असा विश्वास व्यक्त करतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्धाच्या अभिधम्म या ग्रंथाला मेट्यफिसिक्स म्हटले आहे. त्यांनी त्यांच्या पाली शब्दकोशात खंड 16 मध्ये पुढील अर्थ नमूद केला आहे.
‘अभिधम्मो’=‘Higher doctrine transcendental’
‘अभिधम्मं’, doctrine Metaphysics.

मराठीत मेटाफिजिक्सचा अर्थ तत्तवमीमांसा असा होतो, जो अस्तित्व, वस्तू आणि त्यांचे गुणधर्म, शक्यता, कार्यकारणभाव, अवकाश (space) आणि काळ (time) यांसारख्या वास्तवाच्या सामान्य स्वरूपाचा अभ्यास करणारी तत्त्वज्ञानाची एक शाखा आहे.

हा विषय सर्व विशिष्ट विज्ञानांना आणि ज्ञानशाखांना आधारभूत असलेल्या गृहितकांचा अभ्यास करतो.

या वरून तथागत बुद्ध किती महान संशोधक होते याची कल्पना यावी!

**संदर्भ :**
1. संयुक्त निकाय, 1.1.168, उपचालासुत्त
2. क्या बुद्ध नास्तिक थे? गोयंका, एस. एन - पान 99
3. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन व भाषण खंड 16 पान 538 ■ ■

# बौद्ध भिक्षूचे खरे कार्य कोणते?

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 14 ऑक्टो. 1956 ला पवित्र दिक्षाभूमी नागपूर येथे आपल्या अनुयायांना बौद्ध धम्माची दीक्षा दिली. बौद्ध धम्म हा एकेकाळी संपूर्ण भारतात लोकांनी अंगिकृत केला होता. काही वर्षानंतर भारतातून हा धम्म संपविण्यात आला. त्याची कारणे डॉ. बाबासाहेबांनी सांगितली आहेत. त्याची कारणे देतांना डॉ. बाबासाहेब म्हणतात एखाद्या धर्माला ग्लानि का येते? 1) धर्माची शिकवण दर्जेदार नसेल तर तो धर्म जास्त काळ टिकत नाही 2) धर्म पाळणारे अनुयायी योग्य नसतील तर तो धर्म टिकणार नाही आणि महत्वाचे म्हणजे जर त्या धर्माचे प्रचारक विद्वान नसतील किंबहूना वादविवाद करण्यामध्ये निष्णात नसतील तर तो धर्म दिर्घकाळ टिकणार नाही. वरील तीनही कसोटीमध्ये बसाणारे धर्म चिरकाल टिकतात नाही तर ते काळाच्या ओघात नष्ट होतात. डॉ. बाबासाहेबांनी आपल्या अनुयायांकडून वरील तीनही कसोटींची अपेक्षा केली होती. प्रामुख्याने त्यांनी धम्मप्रचारकाची भूमिका बौद्ध भिक्षूंनी पार पाडावी व बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार संपूर्ण भारतभर करावा. त्यांच्या या अपेक्षेला कुठेतरी तडा गेला आहे असे खेदाने म्हणावेसे वाटते. दि 31/08/2025 ला दीक्षाभूमी येथे महाबोधी महाविहार चळवळी संबंधी भन्ते विनाचार्य व भन्ते आकाश लामा यांचे मनोमिलन घडून आणण्यासाठी भंते सुरई ससाई यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त सभा आयोजित करण्यात आली होती. जनतेने त्यांना महाबोधी महाविहाराच्या मुक्ती चळवळीसाठी एकत्र लढण्यासाठी सभा आयोजित करावी. खरोखर समाजासाठी हे वेदनादायी होते. ज्या भंतेनी जनतेला योग्य मार्ग दाखवावा त्याच भंते वर्गाला समाजाने मार्ग दाखवावा. कुठेतरी समाजाने याची दखल घेणे गरजेचे आहे. विशेष म्हणजे भंते नेत्यांसारखी भाषणे देतात. चळवळीचे नेतृत्व समाजातून निर्माण झाले पाहिजे. त्यासाठी सामाजिक अथवा धार्मिक संघटना कार्यरत असल्या पाहिजे. काही स्वयंसेवी संघटनांनी पुढाकार घेतला पाहिजे. भंतेनी केवळ धम्म प्रचारकाचे आणि धम्माचे महत्व तसेच त्याचे आचरण करण्यासाठी सतत प्रयत्न केले पाहिजे. त्यांनी कोणत्याही एका चळवळीसाठी अथवा कार्यासाठी आपला संपूर्ण वेळ देवू असे माझे मत आहे. कारण धम्म प्रचारकाचे आणि समाजाला दिशा देण्याचे कार्य अफाट असून अत्यंत महत्वाचे आहे. भंते विनाचार्य तसेच आकाश लामा यांनी आपला वेळ व कार्य केवळ या चळवळी पुरते मर्यादित न ठेवता त्याची व्याप्ती वाढवावी.



शैलेन्द्र तायडे,
मो. 87888 65051

जनतेकडे ही चळवळ सोपवून धम्म प्रचारासाठी मार्गस्थ व्हावे. जनतेने तसेच भारतीय बौद्ध महासभा सारख्या इतर संघटनांनी या चळवळीचे नेतृत्व करावे. राजकीय नेत्यांनी या बौद्ध समाजाच्या अस्मितेच्या चळवळीकडे लक्ष द्यावे. आणि महाबोधी महाविहार बौद्ध भिक्षूंच्या नियंत्रणात द्यावा. ■ ■

# देवाची नशा... दुसरे काय?




मंगलमूर्ती मोर या.... एक दोन तिन चार.... गणपतीचा जयजयकार.... देवा रे देवा गणपती देवा... असे तेल्याचा परम्या - (परमेश्वर) घसा ताणून ताणून ओरडत होता. मोठा जुलूस निघाला होता... गणपतीला बुडवायला... पण गणपती बुडालाच नाही.... तो तसाच यांच्याच डोक्यात आणि बोकांडी बसून राहीला... तो कायमचाच. जसे एखादे भूत एखाद्याच्या मानगुटीवर बसतेय.... तसे. परम्याचा आवाज बसला होता, तरी पण तो ओरडतच् होता. त्याच्या मागे गावातील लोहाराचा पक्या (प्रकाश) सुताराचा मन्या, (मनोहर) कुंभाराचा सुन्या, (सुनिल) वाण्याचा रम्या, (रमेश) चांभाराचा चंदू (चंद्रप्रकाश), धनगराचा तिंब्या (त्रिंबक), कुणब्याचे शेंबडे पाटील, डुकरे पाटील, कोल्हे पाटील ई., मांगाचा गण्या (गणेश) असे सगळेच् जण ओरडत होते. हे जगप्रसिद्ध सत्य आहे, खरे आहे की...., कोणत्याही मातीच्या मूर्तीत, दगडाच्या मूर्तीत, लाकडाच्या मूर्तीत जीव नसतो. माती दगडाच्या मूर्तीला काही ऐकू येत नसते, मातीची मूर्ती बघत नसते, मातीची मूर्ती बोलत नसते, मातीची मूर्ती खात नसते. मातीची मूर्ती पित नसते. मातीची मूर्ती श्वासोच्छवास घेत नसते. मातीच्या मूर्तीत जीव नसतो, प्राण नसतो, आत्मा ही नसतो. असे काहीच... काहीच.. नसते. मूर्तीला काही समजत नसते. भान नसते. भावना नसतात. मातीच्या मूर्तीत कुठल्याच संवेदना नसतात. ना मानवीय.... ना नैसर्गिक... ना ईश्वरीय... तरीही मांगाचा गण्या, कुणब्याचे शेंबडे, डुकरे, कोल्हे ई. सह तेल्याचा परम्या ओरडतच् होता. बेंबीच्या देठापासून.. ते देठ तुटेपर्यंत! गणपती बाप्पा मोर या.... पुढच्या वर्षी लवकर या.. कशाला? तर काही माहीत नाही. कारण त्याच्या डोक्यात टिळकाने (ब्राह्मणाने) हे भरवलेले होते. कालच् तेल्याच्या परम्याला (परमेश्वरला) डॉक्टराने हे बजावले होते की, देव, पुजा, अर्चा, प्रसाद, नैवेद्य, उपास, तापास याच्या आहारी जाऊ नकोस... ही एक नशा आहे. ती मेंदूला गारद करतेय. ती शरीराला पंगू बनवतेय. तु खुप खुप शिक्षण घे. छान नोकरी कर. तुझे कुटूंब जप. आई, वडीलांची सेवा कर. त्यांचा आशिर्वाद घे, हीच खरी जीवनातील कमाई आहे. हीच खरी ईश्वर सेवा आहे. आई वडीलांचाच खरा आशिर्वाद आहे. बाकी सब झूठ आहे. राजकारण्यांच्या, देवा धर्माच्या, मंदिराच्या, पुजाऱ्यांच्या, बाबा, बुवा, दादा, दिदी, साधू, संत, महंत, साधक, रामरहीम, आसाराम बापू ई. सारख्यांच्या सावलीलाही उभा राहू नकोस.. त्यांना दक्षिणा देऊ नकोस. अशांच्या नादी लागून आयुष्य बरबाद करू नकोस. कोणाचेही मूत्र पेऊ नकोस. कोणाचेही शेण खाऊ नकोस. असे वागणे हे जगातले सर्वात मोठ्ठे खोटे आहे. सर्वात मोठ्ठी फसवणूक आहे. विज्ञान हेच सत्य आहे. मानवता हेच सत्य आहे. वास्तव हेच सत्य आहे. ई. ई. तरीही परम्या ऐकला नाही. घोषणा देतच् होता. घोषणा देत.. देतच् शहरात बंदी असतानाही तिन चार ठिकाणी खुप पित गेला... देवाच्या मिरवणुकीत नाचायला बळ यावे म्हणून उर फाटेपर्यंत... पिला. गणपती बाप्पा मोर या.... मंगलमूर्ती मोर या.... पुढच्या वर्षी लवकर या.... म्हणत होता. देवाच्या नावाने.... परम्याला खुप चढली.... देवाची नशा.... दुसरे काय? आणि त्यात... शेवटी परम्याचा घोषणा देऊन.. देऊन.. आवाज बसला. परम्या थकला म्हणून त्याच्या जोडीला सुताराचा मन्या आला. त्याचाही ओरडून ओरडून घसा बसला.... मग परम्या, मन्या, पक्या, सुन्या, शेंबडे, कोल्हे, डुकरे ई. असे सगळे रात्रभर नाचत होते... घोषणा देत होते... सगळे थकले... तर तिकडे संविधान वाचुन छान शिक्षण घेऊन, मोठ मोठे आधिकारी बनून जोशी, देशपांडे, कुलकर्णी, धर्माधिकारी यांची मजा घरात बसून बघत होते. परम्याचे (परमेश्वराचे) खुप वयस्कर आणि खुप थकलेले... म्हातारे आई वडील घरात खायला दाना नाही म्हणून रात्रभर दारात लेकराची वाट पहात बसले होते..... चिमणी एवढे तोंड करून.... कोणी शेजारी पाजारी त्यांना विचारायला आले नाहीत. कारण परम्या एका पक्षाचा रुमाल गळ्याभोवती गुंडाळून रोज सकाळी घराबाहेर निघायचा म्हणून.... आणि शेजारी राहणारे दुसऱ्याच पक्षाचे! आई-वडील बिचारे रात्रभर डोक्याला हात लावून विचार करीत बसले होते... की, लेकरू म्हटले आहे.... मी गेलो की लगेच खायला घेऊन आलो..... लेकरू आज सणासूदीचे काही तरी गोड - धोड खायला घेऊन येईल, या आशेवर ते होते... तो थाप मारणार नाही, असे ते एकमेकांना समजावत होते. ते दोघे एकमेकांना धिर देत बसले होते. लेकरू आता येईल... लेकरू मग येईल... या आशेवर त्यांनी रात्र जागून काढली.. दोघे ही टकमक एकमेकांकडे बघत बसले.



ॲड. सुभाष सावंगीकर
मो. 9325209492

दोघांच्याही डोळ्यातून आश्रू ओघळू लागले.... एकमेकांना धिर देत .... देत..... शेवटी रात्र सरली.... लेकराची वाट बघून.... बघून.... भुकेने व्याकूळ झालेल्या आई वडीलांनी.... शेवटी लेकरू जे उपरणे गळ्यात घालून घराबाहेर पडायचा.... ना.... ते उपरणे हातात घेऊन.... त्याकडे लेकरासारखे टकमक बघत.. बघत... लेकराच्या आठवणीत त्यांनी एकमेकांचे हात हातात घट्ट धरून.... ते घट्ट आवळून.... त्यांनी.... पहाटे.. पहाटे... डोळे मिटवले.... ते कायमचेच.... तरीही परम्या (परमेश्वर) त्यांच्या घरी आलाच नाही.... ■ ■

## बहुजन मानस





नागेश चौधरी (बहुजन विचारवंत)
9970873560

# क्रांती : आर्थिक आणि सामाजिक

***जाती व्यवस्था नष्ट करणे म्हणजे मानवता उभी करणे आहे आणि ही मानवता उभी केल्यावर मग तुम्हाला आर्थिकतेचे, शोषणाचे रुप दिसेल. या देशातील आर्थिकता देखील जातीच्या उतरंडी प्रमाणे आहे उच्च जातीय किंवा ज्यांना स्वतःला उच्च म्हणतात, वर म्हणतात त्या जाती संपन्न आहेत आणि या जाती व्यवस्थेच्या उतरंडीमध्ये आपण जसे जसे खाली जातो तसतशी गरिबी वाढतांना दिसते. म्हणजे नुसती गरीबीच नाही तर शैक्षणिक भाग असेल, नोकऱ्यातील स्थान असेल हे सगळे जातीप्रमाणे आहेत.***

ब्राह्मणी जातींमध्ये आर्थिक संपन्नता आहे आणि शूद्रातिशूद्र, आदिवासीमध्ये सामाजिक नीचतेबरोबरच गरिबी आहे आणि अशाप्रकारे हे दिसते की ह्या देशातील जातीव्यवस्था ही केवळ सामाजिक उतरंड नाही तर ती आर्थिक उतरंड देखील आहे. म्हणजे जातीनुसार, उच्चनीचते बरोबर आर्थिक विषमता सुद्धा निर्माण केली आहे आणि हे ज्या लोकांनी केले ते भांडवलदार नव्हते, ते जमीनदार नव्हते तर ते सामाजिक रचनेचे निर्माते होते. म्हणजे त्यांनी त्या दृष्टीने सामाजिक रचना निर्माण केली त्या सामाजिक रचनेला ते धर्म म्हणतात. हिंदू राष्ट्र म्हणतात.

उदाहरण द्यायचे झाले तर आर.एस.एस.चे द्वितीय सरसंघचालक गोळवलकर, संघाचे मुख्य सिद्धांतकार, यांनी जी काही पुस्तके लिहिली, जी मांडणी केलेली आहे त्या मांडणीमध्ये ते असे म्हणतात की चातुर्वर्ण्य हे हिंदू राष्ट्र आहे. त्याप्रमाणे हा धर्म आहे. याचे मूळ कुठल्याही जमीनदाराच्या विचारात नाही. त्याचे मूळ ब्राह्मण निर्मित वेद, मनुस्मृती आदी मध्ये आहे. मनुस्मृतीच्या बाराव्या अध्यायामध्ये पहिल्याच श्लोकात म्हटले आहे की चातुर्वर्ण्य हा धर्म आहे. खरे म्हणजे हा अधर्म आहे म्हणजे जी मनुस्मृतीची मांडणी आहे तिला आज देखील या देशातील ब्राह्मणी विचारवंत, संघाचे विचारवंत पुरस्कृत करतात आणि तिला ते हिंदुराष्ट्र म्हणतात. या हिंदुराष्ट्र प्रकाराला कम्युनिस्टांनी मूलभूतपणे विरोध केलेला दिसत नाही. मनुस्मृती दहन करण्याची त्यांना अजूनही गरज वाटत नाही. या उलट माझ्या वाचनात आले की दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू युनिव्हर्सिटीत जेव्हा तिथल्या विद्यार्थ्यांनी मनुस्मृतीचे दहन केले त्याला सीपीएमच्या वृंदा करात नेतीने विरोध करत हा धार्मिक भावना दुखावण्याचा प्रकार आहे असे म्हटले होते. म्हणजे ज्याप्रमाणे महात्मा फुले वा आंबेडकर किंवा पेरियार यांनी ज्या प्रकारे जाती व्यवस्थेवर प्रहार केले तशा प्रकारचे प्रहार कम्युनिस्टांनी केलेले दिसत नाही.

**‘सरंजामशाही आणि ब्राह्मणशाही’ :**
काही साम्यवादी कम्युनिस्ट पक्ष सरंजामदार जातीव्यवस्थेचे निर्माते वा रक्षक आहेत अशी मांडणी करताना दिसतात.

भारतातील सरंजामशाही ही जात निर्माणकांची करतूत आहे. ती या प्रमाणे -

Post-Mauryan Feudalism was founded on a caste system that separated society into four distinct groups: Brahmanas, Kshatriyas, Vaishyas, and Shudras. whereas European Feudalism divided society into three distinct groups: church, aristocracy, and commoners. (Source: Indian Feudalism unacademy.com)

म्हणजे इथल्या सरंजामशाही आणि युरोपीय सरंजामशाही यात स्पस्टपणे फरक आहे. त्याच प्रमाणे इथल्या सरंजामशाही पेक्षा ब्राह्मणशाही जास्त अमानवी आहे. ज्या शाहू राजे वा बडोदा नरेश गायकवाड याना आपण सरंजामी म्हणता त्यांनी जाती व्यवस्थेचा विरोध केला आणि कम्युनिस्टांचेही आवडते टिळक यांनी शाहू राजांचा आरक्षणावरुन विरोध केला होता आणि त्यांची ‘री’ कॉम्रेड डांगे ओढत होते.



यात केवळ डांगेच नव्हते तर जवळपास संपूर्ण ब्राह्मण समूह शाहूराजे विरोधी होता. आजही तेवढ्याच आक्रमकपणे ब्राह्मणी संघटना विरोध करतात. मंडल आयोगाला जो हिंसक विरोध झाला तोही याच जात समुहाने केला. याचा अर्थ ब्राह्मणशाही सरंजामशाहीवर ताण करत होती आणि आजही इथे संघ नियंत्रित सत्ता आहे आणि ती ब्राह्मणी आहे. सरंजामशाहीलाही दुय्यमतेत ठेवणारी आहे. वामनी फॅसिझम आहे. डॉ. आंबेडकर म्हणाले होते त्या प्रमाणे फॅसिझमपेक्षाही जास्त अमानवी आहे. म्हणजे इथे जात व्यवस्था नष्ट करायला प्राथमिकता दिली तरच समतेचा लढा पुढे जाऊ शकेल. अध्यायामध्ये पहिल्याच श्लोकात म्हटले आहे की चातुर्वर्ण्य हा धर्म आहे. खरे म्हणजे हा अधर्म आहे म्हणजे जी मनुस्मृतीची मांडणी आहे तिला आज देखील या देशातील ब्राह्मणी विचारवंत, संघाचे विचारवंत पुरस्कृत करतात आणि तिला ते हिंदुराष्ट्र म्हणतात.

या हिंदुराष्ट्र प्रकाराला कम्युनिस्टांनी मूलभूतपणे विरोध केलेला दिसत नाही. मनुस्मृती दहन करण्याची त्यांना अजूनही गरज वाटत नाही.

या उलट माझ्या वाचनात आले की दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू युनिव्हर्सिटीत जेव्हा तिथल्या विद्यार्थ्यांनी मनुस्मृतीचे दहन केले त्याला सीपीएमच्या वृंदा करात नेतीने विरोध करत हा धार्मिक भावना दुखावण्याचा प्रकार आहे असे म्हटले होते. म्हणजे ज्याप्रमाणे महात्मा फुले वा आंबेडकर किंवा पेरियार यांनी ज्या प्रकारे जाती व्यवस्थेवर प्रहार केले तशा प्रकारचे प्रहार कम्युनिस्टांनी केलेले दिसत नाही. ■ ■

## वाचकांचे विचारपिठ

### प्रा. प्रवीण कांबळे सराचे महत्त्वपूर्ण आणि दिशार्शक लेखन

प्रा. प्रवीण कांबळे सरांनी ‘रिपब्लिकन पक्षांसंदर्भात आंबेडकरी युवक उदासीन का?’ या लेखातून आपले अभ्यासपूर्ण, सुसंगत असे चिंतनीय विचार मांडले आहेत. निश्चितच रिपब्लिकन पक्षाच्या पुनर्बांधणीला ऊर्जितावस्था प्राप्त होण्याच्या प्रक्रियेत मोलाची भूमिका बजावू शकतात. युवा वर्गाची उदासीनता कशी घालवता येईल हा एक कळीचा मुद्दा सरांनी उपस्थित करून त्यावर उपायही सुचविला आहे. युवकांचे ज्वलंत प्रश्न घेऊन आपण आंदोलन उभे केले पाहिजे. असे सराचे म्हणणे आहे. खरेआहे. आपण त्यांच्या प्रश्नावर प्रामाणिकपणे लढे उभारत नसल्याने युवक इतर संघटनेच्या नादी लागतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इंडिपेंडेंट लेबर युनियनची स्थापना केली. आपली हक्काची स्वतंत्र मजदूर युनियन असतानाही अनेक कर्मचारी इतर संघटनेचे सभासद बनतात आणि फुले, शाहू, आंबेडकर विचार विरोधी संघटनेला मोठे करण्यात कळत नकळत हातभार लावतात. फुले, शाहू, आंबेडकरी कर्मचाऱ्यांनी इतर संघटनेतील आपला सहभाग खारीज करून आपल्या विचाराच्या संघटनेचे सभासद बनले पाहिजे आणि आपल्या विचाराच्या ज्या ज्या संघटना आहेत त्यांनी इंडिपेंडेंट लेबर युनियनशी अफिलिएट झाले पाहिजे, असे सुचवावेसे वाटते. प्रा.प्रवीण कांबळे सरांना त्यांच्या महत्त्वपूर्ण आणि दिशार्शक लेखन प्रपंचास मंगल कामना स्नेहांकित जयभीम! ■ ■

सूर्यकांत मुनघाटे




## सम्यक बहुउद्देशीय संस्था

द्वारा संचालित विपश्यना केंद्र त्रिमुर्ती नगर नागपूर. दररोज सकाळ संध्याकाळ नियमितपणे वंदना, विपश्यना केली जाते. बुध्द फुले शाहु आंबेडकर व सम्राट अशोक जयंती, स्मृती दिवस, महिला दिवस, धम्मचक्र प्रवर्तन दिवस सविधान साजरे केले जातात. पौणिमा/अमावशा व तिन महिन्याच्या वर्षावास कार्यक्रम असतो. संम्बोधी महिला मंडळ सह सचिव डी.एस. वाहाणे सक्रीय आहेत.

संवाद मित्र
डी. एस. वाहाणे

# महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती अंनिसचे राज्यस्तरीय पुरस्कार 2025



**नागपूर :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, जिल्हा नागपूरचे सात क्रियाशील कार्यकर्त्यांना 1)सावित्रीमाई फुले महिला कार्यकर्ती पुरस्कार, 2)आधारस्तंभ पुरस्कार व 3) ग्रंथमित्र पुरस्कार 2025 जाहीर करण्यात आले आहेत, अशी माहिती अंनिसच्या मुक्ता दाभोलकर आणि राहुल थोरात यांनी दिली. देवयानी सुनील भगत, अंनिस, नागपूर जिल्हा शाखा, वैज्ञानिक कार्यवाह यांना अनिस चा महत्त्वाचा सावित्रीबाई फुले महिला कार्यकर्ता पुरस्कार घोषित झाला आहे. या निमित्त त्यांना स्मृतीचिन्ह आणि दहा हजार रुपये रोख रक्कम प्रदान करण्यात येणार आहे.

नागपूर जिल्हा शाखा पदाधिकारी प्रा.पुष्पा घोडके, वर्षा सहारे, विजया ठाकरे, नागपूर जिल्हा दक्षिण शाखा कार्याध्यक्ष मंगला गाणार, यांना अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र आधारस्तंभ पुरस्कार जाहीर झाला आहे.

नागपूर जिल्हा शाखा कोषाध्यक्ष चंद्रशेखर मेश्राम, व क्रियाशील कार्यकर्ते विजयकांत पाणबुडे यांना ग्रंथमित्र पुरस्कार जाहीर झाला आहे. अनिसचे हे कार्यकर्ते डॉ. नरेंद्र दाभोलकरांचा विचार घेऊन समाजामध्ये अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य चिकाटीने करत आहेत. त्यांच्या क्रियाशीलतेमुळे नागपूर, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली जिल्ह्यामध्ये संघटनेचे काम वाढत आहे. अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र या मासिकाच्या वाढीसाठी हे कार्यकर्ते सतत प्रयत्नशील असतात.

ह्या सहामाही राज्यस्तरीय अधिवेशन कार्यक्रमाचे उद्घाटन शनिवारी दि. 13 सप्टेंबर 2025 रोजी सकाळी ओम लॉन्स मंगल कार्यालय, सावेवाडी, लातूर येथे उद्घाटक माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील(अध्यक्ष - नवछत्रपती शीक्षण संस्था, लातूर) आणि प्रमुख पाहुणे- मा. अण्णाराव पाटील (प्रसिद्ध विधितज्ञ, लातूर) ह्यांचे हस्ते होणार आहे. हा राज्यस्तरीय पुरस्कार 2025 वितरण समारंभ लातूर येथे रविवार दि. 14 सप्टेंबर 2025 रोजी सकाळी प्रमुख अतिथी - पन्नालाल भाऊ सुराणा (ज्येष्ठ समाजवादी कार्यकर्ता) आणि अध्यक्ष - गणेश चिंचोळे (अध्यक्ष, अंधश्रद्धा निर्मूलन समिती महाराष्ट्र ट्रस्ट) हस्ते होणार आहे. मुक्ता दाभोलकर, डॉ. हमीद दाभोळकर, राजीव देशपांडे, राहुल थोरात आणि इतर राज्य कार्यकारिणी सदस्य उपस्थित असणार आहेत.

पुरस्कार प्राप्त कार्यकत्यांचे अभिनंदन राज्य कार्यकारिणी सदस्य रामभाऊ डोंगरे, विजया श्रीखंडे, राम काळे, नागपूर जिल्हा कार्याध्यक्ष चित्तरंजन चौरे, नागपूर जिल्हा प्रधान सचिव डॉ. सुनिल भगत, देवानंद बडगे,गौतम पाटील , सुषमा शेवडे, इंदू उमरे, प्रितम शंभरकर, शशिकांत बनकर, अविनाश सुखदेवे, शोभा पाटील, लता सुखदेवे, डॉ. विकास होले, प्रीती नगरारे, चंदा मोटघरे, दीप्ती नाईक, अशोक राऊत, चोखोबा ढवळे, शारदा मोटघरे, आणि इतर मान्यवर मंडळी यांनी केले.

## संघरत्न बुद्ध विहारात कांचन दर्शनीक यांचे व्याख्यान



**नागपूर :** वर्षावास निमित्ताने व्याख्यान मालिका संघरत्न विहारांमध्ये सुरू करण्यात आलेली आहे व्याख्यान क्रमांक 9 दिनांक 6 सप्टेंबर 2025 ला संघरत्न विहारात घेण्यात आले व्याख्यात्या कांचन दर्शनीक समता सैनिक दल ऑल इंडिया महिला संघटक या लाभल्यात तर अध्यक्ष म्हणून छायाताई ढोक व वक्ता म्हणून लांजेवार सर कार्यक्रमाला उपस्थित होते. कांचन यांनी माता यशोधरा यांचे बुद्ध धम्मा मधील महत्व आणि समता सैनिक दलाचे कार्य याबद्दल ची माहिती दिली. लांजेवार सरांनी आंबेडकरांची कार्य समजून सांगितले तर छायाताई ढोक यांनी आंबेडकरी आंदोलनाविषयीची माहिती दिली अन्नपूर्णा खांडेकर यांनी प्रास्ताविक केले. संचालन ज्योती आवळे यांनी केले आभार प्रदर्शन रिता कोसारे यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता निर्मला लांजेवार, शोभा खडसे, मून, सुचित्रा धनविजय, धनश्री पाटील अंजनाबाई सुटे माया गायकवाड इत्यादींनी परिश्रम घेतले.

## जांभूळघाट आश्रमशाळा विषबाधा प्रकरण आठ दिवसात कारवाई करण्याचे आश्वासन

**चंद्रपूर :** चिमूर तालुक्यातील जांभूळघाट येथील आदिवासी आश्रम शाळेत 8 व 9 ऑगस्ट 2025 रोजी शिळेअन्न खाल्ल्याने 267 मुला-मुलींना विषबाधा झाली. प्रशासनाने गंभीर दखल न घेतल्याने पालक व सामाजिक कार्यकर्ते यांनी स्वतः पुढाकार घेऊन विषबाधा झालेल्या विद्यार्थ्यांना खाजगी रुग्णालयात भरती केले. परंतु आश्रम शाळेतील कर्मचारी, मुख्याध्यापक, अधीक्षक, अधीक्षिका यांनी या घटनेची हवी तेवढी दखल घेतली नाही. स्थानिक बसपा नेत्यांनी व विविध आदिवासी समाजातील कार्यकर्ते व संघटनांनी पुढाकार घेऊन वृत्तपत्राद्वारे वाचा फोडण्याचा प्रयत्न केला होता.




संबंधित घटनेला एक महिना होत असूनही अजूनपर्यंत दोषींवर काहीही कार्यवाही झाली नाही. त्यामुळे संबंधितांवर कार्यवाही करावी यासाठी बहुजन समाज पार्टी महाराष्ट्र प्रदेशचे मिडीया प्रभारी उत्तम शेवडे, चंद्रपूर जिल्ह्या बसपाचे प्रभारी प्रा. रामराव ननावरे, पहांदीपारी कृपाललिंगो आदिवासी संघर्ष समितीचे अध्यक्ष भाऊ टेकाम, गोंडवाना संग्राम परिषदेचे डॉ. निरंजन मसराम, राजकुमार मसराम, प्रेरणादायी विरांगणा मुक्ताई आदिवासी चारिटेबल ट्रस्टचे पुरुषोत्तम रंधवे, आदिवासी कृती समितीचे रोहित इलपाची, नागपूर जिल्हा बसपाचे एड वीरेश वरखडे, जिल्हा महासचिव चंद्रशेखर कांबळे, सचिव अभिलेश वाहने, निखिल बोंबर्डे यांच्या शिष्टमंडळाने नागपूर विभागाच्या आदिवासी अप्पर आयुक्त आयुषी सिंह यांची नुकतीच भेट घेऊन आश्रम शाळेतील अनेक गैरसोइवर चर्चा करून संबंधितावर कारवाई करण्यासाठी निवेदन दिले. त्यांनी प्रकरणाचे गांभीर्य ओळखून आठ दिवसात चौकशी करून कारवाई करण्याचे आश्वासन दिले. यावेळी विशेषता आश्रम शाळेत दिले जाणारे भोजन हे नेहमीच निकृष्ट दर्जाचे असते, त्यात सुधार केल्या जावा यावर अनेक विद्यार्थी व पालकांनी मत व्यक्त केले. यावर आयुषी सिंह मॅडम यांनी आठ दिवसात संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करेल असे आश्वासन दिले.

## युवा चळवळ, जे आय.एच.च्या 18 व्या रक्तदान शिबिराला 925 युनिट रक्त संकलन

**नागपूर :** मिलादुन्नबीनिमित्त, महाराष्ट्र युवा चळवळीची नागपूर शाखा, जमाअ़त ए इस्लामी हिंद नागपूर (जेआयएच) संघटना, मेडिकल सर्व्हिस सोसायटी नागपूर, स्टुडंट्स इस्लामिक ऑर्गनायझेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 7 ठिकाणी 18 वे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. आमदार विकास ठाकरे यांनी अवस्थी चौकातील न्यू चोपडे लॉन येथे रक्तदान शिबिराचे उद्घाटन केले. यावेळी गोंड किंगचे वंशज सलमान खान, गुरुदेव सेवा मंडळाचे रामदास टेकाडे, सामाजिक कार्यकर्ते शैलेश पांडे, संघटनेचे अध्यक्ष डॉ. नुरुल अमीन इत्यादी उपस्थित होते. त्यानंतर, चोपडे लॉनचे मालक रमेश चोपडे आणि सामाजिक कार्यकर्ते नरेंद्र जिचकर यांचा वायएमएम सदस्य समीरउल्ला खान यांनी सत्कार केला. एमएसएस शहर अध्यक्ष डॉ. नईम नियाझी यांनी अंजुमन पॉलिटेक्निक कॉलेज, सदर येथे रक्तदान शिबिराचे उद्घाटन केले, तर एमपीसीसीचे उपाध्यक्ष ॲड. आसिफ कुरेशी, मुरादाबाद येथील इस्लामिक विद्वान डॉ. मुहम्मद असजद मदनी नदवी, हितवाड येथील हुमैरा मरियम हुसेन आणि सेंटर हॉस्पिटलचे अध्यक्ष हाजी मोहम्मद शोएब अन्सारी यांनी मुस्लिम लायब्ररी, मोमिनपुरा येथील शेजारी असलेल्या अन्सार कम्युनिटी हॉलमध्ये रक्तदान शिबिराचे उद्घाटन केले. त्यानंतर महाराष्ट्र गुजराती समाज मंडळाचे अध्यक्ष जयेश पारेख आणि रेसिडेन्शियल हायस्कूलचे अध्यक्ष मुबीन सर अतिथी म्हणून उपस्थित होते आणि त्यांचा सत्कार करण्यात आला. पाचपावली पोलिस स्टेशनचे पी.आय. बी.आर. राऊत यांनी टेका येथील चार खांबा चौकात असलेल्या किदवाई स्कूल अँड ज्युनियर कॉलेजमध्ये रक्तदान शिबिराचे उद्घाटन केले. त्यानंतर येथे आमदार डॉ. नितीन राऊत यांचाही सत्कार करण्यात आला. ही रक्तदान मोहीम गांधी बाग




चौकातील अल्फा ऑटो डील्स, दहेगावमधील दहेगाव फाटा आणि कामठीतील वारिसपुरा येथील दरोगा मशिदीजवळील जेआयएच कार्यालयात देखील आयोजित करण्यात आली होती. शिबिराचे आयोजक असीमुद्दीन गाजी म्हणाले की, शहरवासीयांनी 925 युनिट रक्तदान करून महान मानवता दाखवली आहे. त्यांनी रक्तदात्यांचे आभार मानले. मंगळवारी मशिदीच्या दोन्ही इमामांनीही रक्तदान केले आणि लोकांना रक्तदानासाठी प्रोत्साहित केले. इतर समाजातील लोकांमध्ये अमोल पटेल, भरिक सिंग, शैलेंद्र नरेते, अंशुमन जैन, लहर जांभुळकर इत्यादींनी रक्तदान करून शिबिराची शोभा वाढवली. वैद्यकीय सेवा सोसायटीच्या डॉक्टरांनी त्यांच्या आरोग्याबाबत अपात्र घोषित झालेल्या रक्तदात्यांना मार्गदर्शन केले. इंदिरा गांधी मेडिकल कॉलेज, जीएमसी, जीवन ज्योती, सुपर हॉस्पिटल, त्रिपुडे हॉस्पिटल आणि डागा हॉस्पिटलच्या रक्तपेढ्यांच्या पथकांनी रक्त संकलनाच्या कामात भाग घेतला. ही माहिती जमाअ़त ए इस्लामी हिंद नागपूरचे मीडिया सेक्रेटरी डॉ. एम.ए. रशीद यांनी दिली.

## महत्वाचे

### ज्येष्ठ नागरिक मंडळातर्फे शिक्षक दिन साजरा



**नागपूर :** ज्येष्ठ नागरिक मंडळ दत्तात्रय नगर रघुजी नगर तर्फे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णनन यांचा वाढदिवस शिक्षक दिन म्हणून जवाहर सोसायटीच्या सभागृहात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. अध्यक्ष नामदेव फटिंग यांनी डॉ. राधाकृष्णन यांच्या फोटोला हार अर्पण केला. हरीश देशमुख व प्रा. महादेव बोराडे यांनी शिक्षक हा आदर्श नागरिक घडविण्याचे मोठे कार्य करीत असतो. म्हणून शिक्षकांचा सन्मान आवश्यक आहे असे सांगितले. तसेच भारतातील प्रथम शिक्षिका सावित्रीबाई फुले यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदानाबद्दल माहिती हरीश देशमुख यांनी दिली. या प्रसंगी शिक्षक व शिक्षण विस्तार अधिकारी पदावरून निवृत्त झालेले गुलाब उमाठे आणि मोरेश्वर मेघरे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी श्रीराम दुरगकर, पद्माकर आगरकर, ह.भ.प. वाल्मीक आंबेकर, गजानन महाले, अरविंद गुंटेवार, कल्पना गाडगे, पद्माकर बाविस्कर, सुरेश धामणकर प्रामुख्याने उपस्थित होते.

### इंदिरा गांधी महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा




**कळमेश्वर :** इंदिरा गांधी कला वाणिज्य महाविद्यालय कळमेश्वर येथे शिक्षक दिनाचा कार्यक्रम प्राचार्य डॉ. राजेंद्र कांबळे यांच्या अध्यक्ष तेखाली पीपल्स वेल्फेअर सोसायटी चे सहसचिव धर्मेंद्र बनसोड यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाच्या कमला वासनिक सभागृहात आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतीक कार्यक्रम सादर करून शिक्षक दिनाचे महत्व पटवून दिले. या प्रसंगी बोलतांना प्राचार्य डॉ. कांबळे यांनी शिक्षक वर्गाने विध्यार्थयाना केवळ शिकवून मोकळे न होता त्यांच्या सर्वांगीन विकास साधून त्यांना आपल्या पायावर ऊभे राहण्यासाठी प्रयत्न करावे. विद्यार्थ्यांनी शिक्षकांनी वेळोवेळी केलेल्या सुचना व मार्गदर्शन याकडे दुर्लक्ष न करता आपले जीवन उज्वल करण्यासाठी लक्ष दिले. पाहिजे तेव्हाच या शिक्षक दिनाची गुरू दक्षिणा ठरेल असे विचार श्री. बनसोड यांनी व्यक्त केले. या प्रसंगी डॉ. मंजुषा ढोबळे, हेमंत बागडे यांनी ही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्राध्यापक निधी गुप्ता, रोशन भगत, मलिक जावेद परवेज, चेतन ठवरे, सजय रामटेके, उमाकांत बल्ले, विनोद पटे सुकन्या घाटोळे, महेश देवघरे, मजुषा कापसे, किशोर दुर्गे आदिचा विद्यार्थ्यांनी पुष्पगुछ देऊन सत्कार केला. संचालन बी.ए. प्रथमची विद्यार्थीनी स्वाती पारसे हिने केले तर आभार प्रदर्शन संजना शेंडे हिने केले.

## सामान्य ग्राहकांना स्मार्ट प्रीपेड मीटरची सक्ती



**नागपूर :** महावितरणकडून राज्यातील वीज ग्राहकांकडे सक्तीने 'स्मार्ट प्रीपेड मीटर' लावले जात आहे. परंतु, यंदाच्या गणेशोत्सवात राज्यातील बहुतांश सार्वजनिक गणेश मंडळांना तात्पुरत्या जोडणीसाठी मात्र साधे मीटर लावले गेल्याची सूत्रांची माहिती आहे. त्यामुळे महावितरणच्या कामावर स्मार्ट प्रीपेड मीटरला विरोध करणाऱ्या वीज कामगारांच्या संघटना आश्चर्य व्यक्त करत आहे. राज्यात 2 कोटी 24 लाख 88 हजार 866 गैरकृषी वीज ग्राहक आहे. त्यांच्या मीटरला 'स्मार्ट मीटर'मध्ये बदलवले जाणार आहे. या मीटरला अनेक ग्राहक संघटनांचा विरोध आहे. विदर्भ ग्राहक संघटनेकडून या मीटरविरोधात उच्च न्यायालयात जनहित याचिकाही दाखल केली गेली आहे. सुरुवातीला महावितरणचे अधिकारी या मीटरबाबत बोलणे टाळत होते. परंतु, त्यानंतर या मीटरचे नाव टी.ओ.डी. मीटर करून बदलणे सुरू झाले. मात्र, यंदाच्या सार्वजनिक गणेश उत्सव मंडळांनी मागितलेल्या तात्पुरत्या जोडणीत निवडक मंडळ सोडले तर बहुतांश ग्राहकांकडे 'स्मार्ट प्रीपेड मीटर' लावतांना काढलेले जुने मीटरच लावले गेले आहे. या वृत्ताला राज्यातील काही जिल्ह्यांतील महावितरणच्या अधिकाऱ्यांनी नाव न टाकण्याच्या अटीवर दुजोरा दिला. महावितरच्या मुख्य आणि इतर जनसंपर्क अधिकाऱ्यांनी या मुद्यावर बोलणे टाळले. ग्राहकांकडे टी.ओ.डी. मीटरच्या नावावर 'स्मार्ट प्रीपेड मीटर' लावले जात आहे. अनेकांचा नकार असूनही त्याकडे महावितरण दुर्लक्ष करत आहे. सार्वजनिक गणेश मंडळांना मात्र साधे मीटर लावले गेले आहे. ग्राहकांनाही साधे मीटर लावण्याचा विकल्प द्यायला हवा, असे मत महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनचे राज्य अध्यक्ष मोहन शर्मा यांनी व्यक्त केले.

## राष्ट्रसंत साहित्यावरील जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेत रेड रोज कॉन्व्हेटचा उत्स्फूर्त सहभाग



**चंद्रपूर :** श्रीगुरुदेव सेवाश्रम नागपूर अंतर्गत राष्ट्रसंत साहित्य अभ्यास मंडळ द्वारा आयोजित आणि राष्ट्रसंत विचार साहित्य परिषदेच्या सहकार्याने गेल्या वर्षीप्रमाणे यावर्षीही जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धा निःशुल्क होती. इयत्ता 7 ते 12 च्या विद्यार्थ्यांसाठी निबंधाचे पुढील विषय दिलेले होते . राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्यातील वैज्ञानिक दृष्टिकोन, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्यातील ग्रामनाथ, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेतील सणोत्सव या विषयांवर घेतलेल्या निबंध स्पर्धेत बल्लारपूर येथील रेड रोज कॉन्व्हेटच्या एकूण? 100 विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग दर्शविला. निबंध स्पर्धेचे आयोजन मुख्याध्यापिका शहजादी अन्सारी, समन्वयक जया ठाकरे, अर्चना काकडे यांनी केले होते.

सहभागी सर्व स्पर्धकांना आकर्षक प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहे असून उत्तम निबंध लिहिणाऱ्या जिल्ह्यातील स्पर्धकांतून विजेत्या स्पर्धकांना रोख पारितोषिके देण्यात येतील.

सदर स्पर्धा चंद्रपूर जिल्ह्यातील यादवराव धोटे महाविद्यालय राजुरा, एफ.ई.एस गर्ल्स हायस्कूल, छोटूभाई पटेल हायस्कूल, लोकमान्य टिळक विद्यालय, विकास विद्यालय विहीरगाव, जनता विद्यालय कोठारी, जनता विद्यालय घुग्घुस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय ब्रम्हपुरी, इंदिरा गांधी विद्यालय चकविरखल, विद्यामंदिर हायस्कूल उर्जानगर, राजीव गांधी महाविद्यालय चंद्रपूर, जि.प. शाळा चांदसुर्ला खैरगाव, नवजीवन हायस्कूल राका, शिवाजी हायस्कूल राजुरा, महात्मा फुले विद्यालय घाटकुळ, जनता विद्यालय ताडाळी, कर्मवीर विद्यालय, नवभारत विद्यालय मुल, देवनील विद्यालय टेकाडी, स्व. बाजीरावजी मून आदीवासी आश्रम शाळा तोहगाव आदी ठिकाणी निबंध स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. जिल्ह्यात उत्तम आयोजन केल्याबद्दल निबंध स्पर्धा नियोजन समितीचे श्रीगुरुदेव सेवाश्रम नागपूरच्या वतीने आभार मानण्यात आले आहे.

## प्रवीण बागड़े यांना प्रबुद्ध साहित्य रत्न पुरस्कार



**नागपूर :** साहित्याच्या माध्यमातून सामाजिक जाणिवा जागृत ठेवणाऱ्या आणि विचारांची नवी दिशा देणाऱ्या साहित्यिकांचा गौरव करण्यासाठी दरवर्षी दिला जाणारा 'प्रबुद्ध साहित्य रत्न पुरस्कार' यंदा नागपूरचे सुप्रसिद्ध साहित्यिक प्रवीण बागडे यांना जाहीर झाला आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण आणि प्रभावी लेखनामुळे हा सन्मान त्यांना बहाल करण्यात आला आहे. प्रवीण बागडे हे गेली अनेक वर्षे मराठी साहित्य क्षेत्रात सक्रि य आहेत. वृत्तपत्रीय संपादकीय, सामाजिक जाणीव जागवणारे लेख, धार्मिक-सांस्कृतिक घडामोडींवरील संपादकीय शैलीतील विवेचन अशा विविध माध्यमांतून त्यांनी मराठी वाचकवर्गाला विचारप्रवण साहित्य दिले आहे. तसेच प्रबुद्ध साहित्य रत्न पुरस्कार प्रवीण बागडे यांना मिळाल्याने मराठी साहित्य क्षेत्राचा गौरव वाढल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे. यापूर्वी सुध्दा विद्यापीठात त्यांच्या उल्लेखनीय कार्य, उत्साह आणि निष्ठेसाठी 'उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कार', 'उत्कृष्ट अधिकारी पुरस्कार', राज्य शासनाचा अहवाल तयार करणेकरीता सक्रिय सहभागासाठी 'लम्पी योद्धा पुरस्कार' आणि नुकतेच देशभर राबविण्यात आलेल्या केंद्र सरकारच्या राष्ट्रीय अभियानाचा विद्यापीठ अहवाल तयार करणेकरीता सक्रिय सहभागासाठी 'विकसित कृषी संकल्प अभियान 2025' पुरस्कार प्रदान करुन गौरविण्यात आले आहे. त्यांच्या लागोपाठ यशस्वी प्रयत्नांचे फार कौतुक केले जाते. ते

# ओबीसी हक्कासाठी न्यायालय आणि रस्त्यावर देणार लढा : वडेट्टीवार

### नागपुरात महामोर्चा काढणार...

**नागपूर :** राज्य सरकारने मराठा समाजाला ओबीसींतून आरक्षण देण्यासाठी काढलेल्या पहिल्या शासन निर्णयात पात्र असा शब्द वापरला होता. नंतर दुसरा शासन निर्णय काढून हा शब्द वगळण्यात आला. याचा अर्थ मराठा समाजाला ओबीसींतून सरसकट आरक्षण देणार असा होतो. हा मूळ ओबीसी समाजावर अन्याय आहे. याविरोधात लढा देण्यासाठी 25 प्रमुख लोकांची एक समिती गठीत करून ऑक्टोबरमध्ये नागपुरात ओबीसींचा महामोर्चा काढणार, अशी माहिती ओबीसी नेते तथा काँग्रेसचे विधानसभेतील पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी दिली.

नागपुरातील रवी भवन येथे शनिवारी विदर्भातील नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा, यवतमाळ, अमरावती, अकोला, बुलढाणा आणि वाशीम जिल्ह्यातील ओबीसी संघटनांची बैठक झाली. या बैठकीत मार्गदर्शन करीत असताना वडेट्टीवार बोलत होते. व्यासपीठावर आमदार अभिजित वंजारी, माजी खासदार खुशाल बोपचे, ओबीसी नेते शेखर सावरबांधे, ओबीसी अभ्यासक नागेश चौधरी, ओबीसी नेते ईश्वर बाळबुधे, ओबीसी नेते ज्ञानेश वाकुडकर, ॲड. किशोर लांबट, ओबीसी युवा अधिकार मंचचे उमेश कोर्राम यांची प्रमुख उपस्थिती होती. तीन तास चाललेल्या या मॅरेथॉन बैठकीत संघटनांच्या नेत्यांनी मराठा समाजाला ओबीसींतून आरक्षण देण्यासंदर्भात स्पष्ट विरोध दर्शविला. विजय वडेट्टीवार म्हणाले, आज ओबीसींसाठी लढताना अनेकदा आर्थिक चणचण जाणवते. पण, नेत्यांना ओबीसींची भीती वाटू




लागताच ही अडचण आपसूकच दूर होईल. ओबीसींच्या लढ्यासाठी प्रसंगी हात पसरू पण न्यायालयीन लढाईसाठी कुठेही आर्थिक अडचण येऊ देणार नाही, अशी ग्वाहीदेखील दिली. मराठा आरक्षणाच्या अनुषंगाने काढलेल्या शासन निर्णयातून ओबीसींचे नक्कीच नुकसान होणार आहे. 27 टक्के आरक्षणातून 13 टक्के आधीच वजा होते. उरलेल्या 19 टक्क्यांतही मराठा समाजाला आरक्षण दिल्यास ओबीसींना किती उरणार? ओबीसींचा हक्कच संपण्याची शक्यता आहे. नागपुरात येत्या 12 सप्टेंबरला प्रमुख ओबीसी नेत्यांची बैठक होणार आहे. या बैठकीत मराठा आरक्षणासंदर्भात जाहीर शासन निर्णयावरील लढाईच्या अनुषंगाने व्यूहरचना निश्चित होईल. मात्र दोन स्तरावर लढाई लढण्याचे शनिवारच्या बैठकीत निश्चित करण्यात आले. पहिली लढाई न्यायालयीन स्तरावर लढली जाणार आहे. विदर्भातून वकील संघटना पूर्ण ताकदीने न्यायालयात बाजू मांडणार आहे. त्यांना ओबीसी संघटनांचा पाठिंबा असेल तर दुसरा लढा आंदोलनाच्या माध्यमातून केला जाईल असेही वडेट्टीवार स्पष्ट केले. कुणावरही अन्याय होऊ नये, ही आमची भूमिका आहे. सोबतच आमच्या हक्काचे संरक्षण होणेही आवश्यक आहे. ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागू नये, ही आमची भूमिका असल्याचेही त्यांनी सांगितले.

> राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा आरक्षणाला विरोध आहे. त्यांच्या विचारसणीचे लोक सत्तेत आहेत. त्यांच्याकडून आपण ओबीसी आरक्षणाला धक्का न लागू देण्याची अपेक्षा कशी करू शकतो? आज आपण न्यायालयीन लढाई न लढल्यास ओबीसींना मोठा धक्का बसणार आहे. ओबीसींचे राजकीय आरक्षण संपविण्याचा त्यांचा डाव आहे.
>
> – वडेट्टीवार

**PROPERTY FOR SALE**




Prime Land with Construction for Sale

**Wela (Hari), Shankarpur Road, Nagpur (Gramin)**

Perfect for Educational Institutions:
Area 0.46 hectares (50,000 Sq. Ft) with construction around 35000 Sq. Ft., Ideal for Schools, College, Training Center, Residential Tution College, Hotel, Hostel, Ambusman Park

**Contact : Sulay 9860361121**

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648